१४

धनुर्धारीरचित-

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

# मराठे सरदार.

## अलिजाबहादर शिंदे.

( राणोजी व जयाप्पा. )

महादेव गुर्जर बुकसेलर आणि
रामवाडी
मुंबई.

किंमत २ आणे.

मुंबईत

"निर्णयसागर" छापखान्यांत रा. रा. बाळकृष्ण रामचंद्र घाणेकर यांनीं मालकांकरितां छापिलें.

# प्रस्तावना.

या आमच्या भरतखंडांत छप्पन देश असून त्यांत अनेक प्रकारचे लोक आहेत; पण मनुष्यपणाचें खरें सौभाग्याचें जें स्वातंत्र्य तें राखण्यासाठीं प्रत्यक्ष प्राणावर उदार होऊन नानातऱ्हेच्या हाल यातना सोसिल्या आणि आपल्या स्वराज्यसौभाग्याचा टिळा जगभर मिरविला असा काय तो एका मराठ्यांनींच. गाय करून सोडलेला आणि पिंजऱ्यांत अडकविलेला असा वाघ डरक्या फोडीत चवताळून बाहेर पडावा आणि त्यानें आपणास कोंडून हालअपेष्टेंत दिन काढावयास आणि मेलेल्या अन्नावर उदरनिर्वाह करावयास लाविणाऱ्या दरवेशांच्या नरडीचा घोंट घेत सारा आसमंतात्भागींचा प्रदेश दणाणून सोडावा अशांतला प्रकार मराठ्यांनीं शतक दीडशतक माजविला होता. तेव्हां त्या प्रकारची साद्यंत हकीकत ऐकावयास मिळेल तर खुद्द त्या वाघांच्या पोटीं जन्मास येऊन मेंढरांच्या कळपांत शिरणाऱ्यांना व शिरलेल्यांना घटकाभर तरी पूर्वस्थितीचें स्मरण होऊन वडिलांच्या कीर्तीची फुशारकी मिरविण्याचा प्रसंग मिळून इतरांच्या अद्भुत अतुलप्रतापाचें अवलोकन घडल्यानें एकप्रकारचें निदान मनोरंजन तरी होईल; या आशेनें यवनपातशाहीच्या छातीवर आपली पातशाही उठवून आपल्या प्रतापाचा झेंडा फडफडावीत सोडणाऱ्या वीरपट्ठ्यांची हळू हळू आणि एकामागून एक अशी मुलाखत करून देण्याचें मनांत योजिलें आहे. ज्या बहाद्दरांनीं आपल्या अंगच्या करामतीनें, असाधारण बाहुबलानें व अटोकाट धोरणाच्या सहाय्यानें दीनदुनयेस घटकाभर थक्क करून टाकणारी स्वराज्याची टोलेजंग इमारत उठवून दिली त्यांच्या, थोडक्यांत पण संपूर्ण अशा इतिवृत्ताची हकीकत हटकून मनोरम होईल असा पुरा भरंवसा आहे. "हिंदुपदपातषाही"ची टोलेजंग इमारत उठविणाऱ्या

नरश्रेष्ठ महाराष्ट्रीयांत १ इंदूरचे होळकर, २ ग्वाल्हरचे अलिजाबाहादर, ३ नागपूरचे भोंसले, ४ बडोद्याचे गाइकवाड, ५ तळेगांवचे दाभाडे, ६ कर्नाटकचे पटवर्धन, ७ विंचूरचे विंचूरकर आणि ८ धारचे पवार हे प्रमुख होत. ही गोष्ट इतिहासवाचकांस नव्यानें सांगावयाची नाहीं. तेव्हां या घराण्यांतील एकंदर हकीकत व्यवस्थेशीर टापटिपीनें आणि थोडक्यांत अशी वाचावयास मिळेल तर एक चांगलें काम होण्यासारखें आहे. आणि इतिहासवाचनाचे कल्याणप्रद जे अनंत फायदे आहेत त्यांचाही आपल्या देशबंधूंस अनायासें फायदा होईल ही उमेद वाटते. ह्मणून फुरसतींतल्या फुरसतींत वेळ काढून हे श्रम केले आहेत. त्याचें चीज करणें इतरांच्या स्वाधीनचें होय; तें त्यांचें त्यांनीं करावें एवढीच इच्छा आहे. दोषांची चर्चा व्हावी ही प्रार्थना वाचकांस वारंवार नेहमींप्रमाणें आहेच.

धनुर्धारी.

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

# मराठे सरदार.

## अलिजाबाहादर शिंदे.

### भाग १ ला.

## राणोजी शिंदे.

### प्रकरण १ लें.

जन्म १६९४. मृत्यु १७४५ इसवी.

आपल्या अंगच्या गुणांनीं मनुष्य भारी थोरपदास चढतो, सर्व दुनयेला आपणास पूज्य मानावयाला लावितो व आपलें चरित्र कौतुकास्पद असें करून ठेवितो; परंतु त्या गुणांचा विकास व्हावयाला आणि आपल्या अंगची कर्तबगारी दाखवावयाला प्रसंग हवा असतो. हे प्रसंग नसतील तर अंगचे गुण असले काय आणि नसले काय सारखेच. त्याचप्रमाणें आपण केलेल्या कर्तबगारीचें चीज होईल अशी खात्री असेल तरच प्रत्यक्ष प्राणाची पर्वा न बाळगतां आपल्या अंगचें पाणी दाखविण्याची प्रबळ लालसा मनुष्यमात्रांत साहजिक उत्पन्न होते. पूर्वीं स्वराज्य व राज्यक्रांति असले प्रसंग कर्तबगारीचें सुरेख चीज करणारे हरहम्मेश असत. ह्मणूनच कैक साधारण क्षुल्लक दिसणाऱ्या माणसांनीं सुद्धां अतुलप्रताप गाजवून आपली कीर्ति अजरामर करून ठेविली आहे. आपल्या प्राणप्रिय महाराष्ट्रदेशांत पूर्वीं स्वराज्य होतें आणि आसपास राज्यक्रांतीचा वखत सदा असे, यामुळें अंगचे गुण दाखविण्याच्या प्रसंगाची त्या वेळीं कम-

तरता नव्हती. आणि **प्रसंगाची** कमतरता नव्हती ह्मणूनच तर अनेक नरपुंगवांनीं आपल्या विमल यशःकीर्तीनें आपल्या परमप्रिय **महाराष्ट्रभूस** सौभाग्यशाली करून सोडिलें; असो, असे प्रसंग प्राप्त झाले असतां ज्यांनीं आपली कीर्तिनौबत दुमदुमिविली, त्यांचा इतिहास मनोरम वाटणें साहजिक आहे. एखादी टोलेजंग इमारत, आसमंताद्भागाच्या प्रदेशांतील सर्व इमारतींत आपण श्रेष्ठ आहें अशा तोऱ्यानें मान वर करीत उभी असावी; तिच्या भव्यपणामुळें इतरांना आपल्या माना खालीं घालण्याखेरीज अन्य गत्यंतर नसावें; तिच्या तेजस्वीपणापुढें इतरांना आपण कःपदार्थ असें वाटावें; आणि अशा त्या इमारतींत राहणारांना आज आपण केवळ स्वर्गसुखाचे अधिकारी आहों, व आपण राहतों ती इमारत शाबूत आहे यामुळें आपण इतरांस पायांखालीं दडपून टाकूं ह्मणून प्रौढी वाटावी तों इतक्यांत आकाशाची वीज कोसळून ती इमारत जमीनदोस्त व्हावी, त्या इमारतीचे आधारभूत स्तंभ इतस्ततः पडावे, ते, इकडील कोंपरा शाबूत तर तिकडील भिंत कोसळलेली; अशी सर्वत्र पडापड झाल्यामुळें आंतील नांदत्या माणसांना आपला जीव बचावण्याकरितां गायांवयां तोंडें करीत पळत सुटण्याचा वखत यावा आणि त्या अखंड लक्ष्मी वसणाऱ्या ठिकाणीं कोल्हीं कुत्रीं लांडगीं आपापलीं वस्तिस्थानें करून बसलेलीं पहावींत ह्मणजे जसें पोटांत भडाडून येतें तसाच प्रकार हल्लींच्या काळीं विद्यमान असलेल्या आह्मां नष्टवैभवी **मराठ्यांच्या** वांट्यास आलेला आहे! ती ललाटरेषा खरी, त्याला आपण काय करणार? परंतु त्या इमारतीपैकीं शाबूत राहिलेले खांब, तुळया वगैरे पाहून एवढे तरी शाबूत आहेत याबद्दल धन्यता वाटावी व त्या उरलेल्या गतवैभवाच्या मोडक्यातोडक्या खांबांकडे पाहून समाधान मानावें याखेरीज

आतां अन्य गत्यंतर नाहीं. ज्याप्रमाणें मनोराज्यांत एक प्रकारचें अनुपमेय सौख्य होत असतें, कीं ज्या सुखाची प्राप्ति तें सर्व प्रत्यक्ष लाधलें तरी व्हावयाची नाहीं, तसेंच गत वैभवाची आठवण आणि त्या वेळच्या सौख्याची कल्पना यांतही त्याच प्रकारचें उत्तम समाधान वाटतें. मृत मनुष्याच्या झालेल्या दुःखांत त्याचा गुणानुवाद जसा समाधानकारक व आनंदास्पद होतो त्याचप्रमाणें प्राचीन वैभवाचा समग्र वृत्तांत, होरपळलेल्या मनास उल्लसित करितो. ह्मणून **मराठे सरदार** एकामागून एक मुलाखतीस आणण्याचा संकल्प केला व त्याप्रमाणें आज **अलिजाबाहादर शिंदे** यांस भेटवावयाचें मनांत आणिलें आहे.

**राणोजी** ह्मणून एक मराठा—कुणबी—**वांई** परगण्यांतील **कण्हेरखेड** गांवचा पाटील असे. **वांई** परगणा हल्लीं **सातारा** जिल्ह्यांत आहे. **कण्हेरखेड**च्या पाटलाचें नांव **शिंदे**. दक्षिणेंत "ब्राह्मणी राज्य" या नांवाची मुसलमानी रियासत होती त्या वेळीं हे **शिंदे** पाटील शिलेदारी पेशानें वागत. पुढें **छत्रपति महाराज** सातारकर यांच्याशीं या शिंदे पाटलांची सोयरिक सुद्धां घडली होती असा दाखला मिळतो. **श्रीमंत छत्रपति शाहुमहाराजास औरंगजेबानें दिल्लीस** अटकेंत ठेविलें होतें तेव्हां या शिंद्याच्या घराण्यांतील एका मुलीशीं छत्रपति **शाहुराजानें** लग्न लाविलें होतें. परंतु दुर्दैवानें **शाहुमहाराज** दिल्लीहून साताऱ्यास आपली पातशाही मिळविण्याकरितां आले. त्याच्या पूर्वींच त्यांची ती बायको वारली. त्यामुळें "मोतीं फुटलें आणि नातें तुटलें" अशी ह्मण आहे, तसा प्रकार **शिंद्याचा** आणि **भोसले** छत्रपतीचा झाला असावा. कसेंही असलें तरी **राणोजीच्या** पूर्वीं त्याचे वाडवडील मराठी साम्राज्यांत ह्मणण्यासारखे कांहीं महशूर नव्हते ही गोष्ट खरी आहे. **औरंगजेबाच्या** मध्यस्थीनें **भोसले**

छत्रपति घराण्यावरोबर **राणोजी**च्या घराण्याची सोयरीक झाली किंवा ब्राह्मणी राज्यांत त्यांनीं **शिलेदारी** गाजविली, तरी **राणोजी** जन्मास आला त्या वेळीं कण्हेरखेडचे शिंदे पाटील फार गरीबींत व अप्रसिद्ध असेच होते याजबद्दल शंका नाहीं. कारण **राणोजी** शिंद्यानें, पेशवे **बाळाजी विश्वनाथ** यांच्याजवळ हुजऱ्याची नौकरी पत्करिली होती. (इ० स० १७१४)**बाळाजी**

---

१. **राणोजी** पाटील असून भोसले, छत्रपति सरकाराशीं सोयरीक केलेल्या घराण्यांतील असतां त्यानें हुजऱ्यासारखीं हलकी व शिलेदारी बाण्याच्या घराण्यास नादान वाटणारी नौकरी कशी पत्करिली याजबद्दल कोणासही शंका साहजिकपणें येणार आहे. सर माल्कम साहेब यांनीं आपल्या इतिहासांत आणि रा. सरंजामे यांनीं शिंदे घराण्याची हकीकत लिहिली आहे त्यांत अशी नौकरी पत्करण्यास राणोजी कां उद्युक्त झाला असावा याचीं कारणें दिलीं आहेत. पेशवे त्या वेळीं अति श्रेष्ठ होते तेव्हां त्यांच्या जवळची अगदीं हलकट नौकरी पत्करिली तरच हटकून खास भाग्योदय होईल असा भरंवसा **राणोजीस** वाटला. ह्मणून त्यानें ती नौकरी पत्करिली असावी असा तर्क या उभयतां इतिहासकारांनीं लढविला आहे. तो कितपत खरा असेल याची शंकाच दिसते. "प्रथमतः बाळाजी विश्वनाथाचा हुजऱ्या झाला यांत तो गरीबीमुळें वर्तला नाहीं; तर राज्यलोभामुळें वर्तला" असें माल्कम साहेब ह्मणतात. आणि रा. सरंजामे यांनीं हुजऱ्याची नौकरी त्या वेळीं हलकट नव्हती असें दाखविण्याचा यत्न केला आहे! परंतु या उभयतांनींही ती नोकरी पत्करितांना **राणोजी** खाऊन पिऊन सुखी होता याबद्दल कांहींच कोठें उल्लेख केलेला नाहीं. आणखी कुलीन घराण्याची त्या वेळची पद्धत सिंहासारखीच ह्मणजे भूक लागली तरी तृणावर निर्वाह करावयाचा नाहीं, अशांतली असे. आणि "राज्यलोभा"च्या गुप्त मान्यामुळें सर्व घराण्यांस काळिमा आणण्यास तयार होण्याइतकें व्यक्तिस्वातंत्र्य अवतीर्ण झालें नव्हतें ह्मणून **राणोजी**नें हुजऱ्याची नौकरी पत्करिली ती केवळ गरीबीमुळेंच असें ह्मणण्याला कांहींच प्रत्यवाय दिसत नाहीं! हा प्रश्न इतक्या महत्वाचा

**विश्वनाथा**ची त्यानें साहा वर्षें नौकरी केली तरी त्याला उदयकाळ कांहीं प्राप्त झाला नाहीं. पुढें **बाजीराव बल्लाळ,** पेशवे झाले आणि त्यांनीं आपल्या जवळच्या या रंकास राव केलें. ह्मणजे **राणोजी**च्या अंगच्या गुणांचा विकास **बाजीरावा**च्या कारकीर्दींत झाला. श्रीमंतांच्या मोहबतीस कारण झालेला प्रसंग कोणता याजबद्दल फार मोठा मतभेद आढळतो. सर माल्कम साहेबांनीं अगदीं एक क्षुल्लक कारण सांगून आमच्या लोकांच्या पदरीं गाजरपारखेपणासारखा प्रकार बांधण्याचा यत्न केला आहे. एके दिवशीं **बाजीराव,** शाहूच्या दरबारांत फार वेळ बसला त्यामुळें त्याचा हुजऱ्या **राणोजी** झोंपीं गेला. झोंपीं गेला तेव्हां **राणोजीनें** पेशव्याच्या पायांतील जोडे आपल्या उराशीं घट्ट धरून ठेविलेले **बाजीरावा**च्या नजरेस आले. त्यामुळें हा भारी इमानी नौकर अशी **बाजीरावा**ची खात्री झाली आणि लगेच **राणोजीस बाजीरावानें** महत्पदास चढविलें, अशी हकीकत **माल्कम** साहेबांनीं सांगितली आहे. पण ती खरी दिसत नाहीं. **बाजीराव** पेशवा **शाहू**च्या दरबारांतून परतला तेव्हां त्याच्या नजरेस झोंपीं गेलेला हुजऱ्या पडणें केवळ अशक्य दिसतें. मुख्य प्रधान दरबारांतून जावयाला निघाला ह्मणजे झोंपीं जाणाऱ्या त्याच्या हुजऱ्याला यजमानानें येऊन पाहण्यापूर्वीं कोणींही उठविलें नसेल हें केवळ असंभवनीय होय असें कोणीही ह्मणेल. शिवाय तसें घडलें हेंही खरें मानलें तरी **बाजीरावा**-

---

नाहीं ही गोष्ट खरी आहे आणि गरीबी कांहीं पातक नव्हे ह्मणून याची ज्यास्त चर्चा करणें निरुपयोगी होय. परंतु **राणोजी** प्रथमतः भारी गरीबींत होता एवढें दाखविल्यानें त्याच्या चरित्रास उज्वलता येण्याचा संभव आहे ह्मणून माल्कम आणि सरंजामे यांचा तर्क बरोबर नाहीं असें वाटतें. तें कळविणें जरूर होतें सबब तसें केलें आहे.

सारखा गुणग्राही मर्द माणूस असल्या क्षुल्लक गोष्टीवरून इतका खुश होईल असें वाटत नाहीं. "राणोजी" मल्हारराव होळकरांशीं फक्त द्रव्यलोभामुळेंच स्नेह करी, असलालीं जाडीं विधानें ठोकण्यास संवकलेल्यांच्या लेखणींतून गळालेली ही आख्यायिका सर्वस्वीं भरंवशालायक दिसत नाहीं.

**सरंजामे** यांनीं शिंदे घराण्याचा इतिहास लिहिला आहे त्यांत ते ह्मणतात, "परंतु ही गोष्ट—माल्कम साहेब सांगतात ती खरी असेल असें वाटत नाहीं. कारण **राणोजीस करोल**–घोडेस्वार–प्रथमतः **बाजीरावानें** केलें. नंतर पाग्या नेमिलें. ह्याविषयीं लेखी आधार आहे" आणि होळकर घराण्याची कैफियत ह्मणून आहे, त्यांत राणोजीस चवऱ्या ढाळीत असतां याला आपला पाग्या नेमा असें पेशव्यांस **मल्हारराव होळकरानें** कळविलें असें लिहिलें आहे. हेंच खरें दिसतें. ह्मणजे **राणोजीचा** भाग्योदय **मल्हारराव होळकराच्या** हस्तें झाला असावा. **मल्हाररावानें** दायबहादुरासारख्या मोंगल सुभेदाराची गर्दन छाटून तो मुलूख सर केला अशा शूर शिपायाचा आणि चवऱ्या ढाळतां ढाळतां जेरीस आलेल्या हुजऱ्याचा हिस्सा सारखा असें कोणासही ह्मणतां येत नाहीं. माळवा सर करून **मल्हारराव** पुण्यास आले व नंतर परत हिंदुस्थानाकडे जाऊं लागले तेव्हां बरोबर **राणोजी**लाही घेतलें, आणि त्याच वेळीं उत्पन्न होईल त्यापैकीं शेंकडा ४५।४५ रुपये **राणोजीनें** व **मल्हाररावानें** सारखे वांटून घ्यावे असें ठरलें होतें. **मल्हाररावाची** संमति नसती तर असा ठराव पेशव्यांस करतां येताना. **मल्हारराव** त्या वेळीं मातबर शिपाई ठरला होता. तसा कांहीं **राणोजीचा** प्रकार नसे. ह्मणून **राणोजीस मल्हाररावानें** सांगितल्यावरून पेशव्यांकडून पागेपणा मिळाला असावा हेंच संभवनीय होय. तें

कसेंही असलें तरी **राणोजीस** पेशव्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत **मल्हाररावाच्या** बरोबर "मुलूखगिऱ्या" करण्यास फर्माविलें ही गोष्ट अगदीं निश्चित आहे.

**राणोजीस** शिपाईगिरी प्राप्त झाली असतां आपल्या समशेरीचा प्रभाव दाखविण्याचा त्याचा पहिला प्रसंग **बऱ्हाणपूर** होय. तेथील मोंगल सुभेदारास हुसकून लाविण्यांत **राणोजीनें** चांगला पुढाकार घेतला होता. (इ. स. १७२४.) पुढील रणसंग्रामाचा मुख्य प्रसंग ह्मणजे काय ती भोपाळची लढाई होय. बाकी मराठ्यांच्या हक्काची स्थापना करीत व होळकराबरोबर मोहिमा झोडीत **राणोजी** फिरत असे. भोपाळची लढाई निजाम आणि पेशवे यांच्यांत झाली. आणि त्या वेळीं पेशव्याबरोबर **राणोजी** शिंदा होता. निजामउल्मुलुखास दे माय धरणी ठाय होऊन तह करण्याखेरीज गत्यंतर नाहीं असें वाटूं लागलें. याला कारण पेशव्यांची आणि त्यांच्याबरोबर **राणोजी**ची समशेर होय. (इ. स. १७३८.) पुढें **चिमणाजी आप्पा** कोंकण सर करावयास निघाले तेव्हां **राणोजी**ही त्यांच्याबरोबर होता. दोघांतिघांचीं सैन्यें एकत्र होऊन मोहिमा करावयास निघाल्यावर त्यांत पुढें फत्ते मिळाली ह्मणजे यशाचा वांटा कोणाच्या समशेरीस याचा निकाल करणें महादुर्घट काम आहे. **राणोजी** रंकाचा राव झाला तो त्याची समशेर सलामत होती ह्मणूनच. त्याच्या अंगीं शौर्य चांगलें होतें परंतु त्या शौर्याची सुरेख खूण पटे असे स्वतंत्र प्रसंग **राणोजी**च्या वांट्यास सहसा आले नाहींत. **होळकर सुभेदार,** पेशवे **बाजीराव** यांपैकीं कोणाच्या तरी बरोबरच हरहमेश **राणोजीस** रहावें लागे. परंतु **वसई** सर करण्याच्या वेळीं मात्र **राणोजीकडे** थोडासा स्वतंत्र "भाग" होता. वसईच्या आसपास असलेलीं तारापूर, डाहाणू वगैरे ठिकाणें सर

करून तेथें पेशव्यांचा अम्मल बसविण्याचें काम एकट्या **राणो-जीकडे** होतें व तें त्यानें फार उत्तम रीतीनें बजाविलें. **वसईच्या** आसपासचा मुलूख सर करून **राणोजी, चिमणाजी आप्पास** किल्ला सर करण्याकरितां बसलेल्या हल्ल्यांत येऊन दाखल झाला. ( इ. स. १७३९. ) तों इतक्यांत नादिरशहाची धाड दिल्लीवर येऊन कोसळली. नादिरशाहावर चाल करून जावयास **बाजीराव** निघाले तेव्हां बरोबर कोणी मातबर शूर पाहिजे ह्मणून **राणोजीस** मजकडे तावडतोब रवाना करा असें **बाजीरावानें चिमणाजी आप्पांस** पत्र लिहिलें. आणि त्याप्रमाणें **राणोजी** निघूनही गेला. यावरून **राणोजीच्या** प्रतापी समशेरीचा व रणपंडिततेचा **बाजीरावासारख्या** रणधुरंधरास मोठा भरंवसा असला पाहिजे हें उघड दिसतें. पुढें दिल्लीपति, मोंगल बादशाहा पेशव्यांच्या ताटाखालचें मांजर झालें. त्या कारस्थानांत **राणोजी** प्रमुख होता. पेशव्यांच्या तर्फे **राणोजी,** आणि बादशाहातर्फे **राणा जयसिंग** या उभयतांनीं मिळून पेशवे व बादशाहा यांनीं कसें वागावें याचा सलोख्यानें निकाल लाविला. कराराप्रमाणें बाद-शहा वागेल अशी हमी **राणा जयसिंगानें** घेतली तेव्हां पेश-व्यांबद्दलचा जिम्मा **राणोजीनें** पत्करिला[1] होता. शिंदे व त्यांचे

---

१. पेशवे कराराप्रमाणें वागतील अशी खात्री **राणोजीनें** केली तेव्हां " धन्याच्या नेक वर्तणुकीसाठीं **राणोजी** महमदशहास लिहून दिलेल्या जामीनकतव्यावर सही घालीत आहे " असा शेरा माल्कम साहेबांनीं आपल्या इतिहासांत मारिला आणि आपल्या पेनाच्या सफाई-तील खोंचदारपणा व्यक्त करून **राणोजीस** महत्व व पेशव्यांचा पाण-उतार करण्याची संधी ऑसाहेबांनीं अनायासें चांगली साधून घेतली आहे. महमदशहाला **राणोजीची** ओळख होती तितकी पेशव्यांची नव्हती आणि त्या बादशहाच्या शेजारीं राणोजी व होळकर असत तसे पेशवे नव्हते यामुळें **राणोजीची** जामिनकी बादशहानें घेतली असेल.

धनी पेशवे हे दाखल होण्यापूर्वींच नादिरशाहा तिकडे आपल्या मुलुखीं परत गेला त्यामुळें तिकडे समशेरीचें फारसें काम पडलें नाहीं. परंतु दिल्लीकर हातचें बाहुलें करून ठेवण्याचा प्रसंग साधण्याचें कारस्थान **राणोजीनें** चांगलें पार पाडिलें यांत संशय नाहीं.

यानंतर पुढें चार पांच वर्षांतच **राणोजीस** देवाज्ञा झाली (इ. स. १७४५). **राणोजी** कोणत्या प्रकारचा मनुष्य होता व त्यानें आपल्या पराक्रमाच्या योगेंकरून काय संपादन केलें हें सागण्याची आवश्यकता नाहीं. आपल्या पूर्वस्थितीचें हरदमेश स्मरण आणि कृतज्ञतेचें चांगलें वर्तन असलें ह्मणजे मग दुसऱ्या कोणत्याही सद्गुणांची वाण पडावयाची नाहीं. आणखी कांहीं दुर्गुण असले तरी ते कोणीकडल्या कोणीकडे काळोखांत पडल्यासारखे असून नाहींसे होतात हें कांहीं कोणास सांगावयाला नको. आपण हुजऱ्या होतों या गोष्टीची आठवण **राणोजी** आजन्म विसरला नाहीं. पेशव्यांच्या पायांतील चर्मी जोडा देवाच्या पादुकांप्रमाणें तो जतन करून ठेवीत असे ह्मणून क्याप्टन स्टुअर्टनामक रेसिडेंटानें साफ लिहून ठेविलें आहे. माल्कम साहेबही ह्मणतात, पेशव्यांच्या जोड्यावर **राणोजीची** "देवासारखी पूज्यबुद्धी होती ती कधीं कमी झाली नाहीं." तेव्हां कृतज्ञता आणि पूर्वस्थितीचें स्मरण **राणोजीस** चांगलें होतें हें खास आहे. आणि या दोन अलौकिक गुणांतच अनेक दुसऱ्या सद्गुणांचा समावेश होतो. आतां **राणोजीनें** शिलेदारी बाणा पत्करलेला व शिपाई अगर सरदारी त्याच्याकडे सोंपविण्यांत आली होती तेव्हां लष्करी गुणांत तो कसा काय होता याचा विचार पहावयास हवा. निधडी छाती, बाणेदार जवानमर्दपणा व

---

परंतु असें केलें ह्मणून पेशव्यांकडे कसा कमीपणा येतो हें साहेबांचें साहेब जाणत.

युद्धकौशल्य याचीही अनुकूलता **राणोजीस** चांगली असावी याजबद्दल शंका नकोच. रजपूत राजांच्या शेजारीं आणि मोंगलासारख्या कडव्या बादशाहीस तुडवीत आपलें राज्य स्थापणें हीं कामें फत्ते समशेरीच्या शूर पठ्याच्याच हातून व्हावयाचीं हें उघड आहे. होळकरांशीं साथ आणि **बाजीराव** पेशव्याची चाकरी रणधुरंधर योद्धयाच्याच हातून साधावयाची, इतरांस ती गोष्ट केवळ अशक्य होय. ह्मणजे सारांश काय तर **राणोजी** लष्करी गुणांतही श्रेष्ठ असे. खाजगी वर्तनांतही त्याच्याकडे कांहीं कमीपणा येण्यासारखा नव्हता. परंतु **माल्कम** साहेबांनीं "आय्यापेक्षां त्याचा खर्च फाजील होता आणि त्यानें मल्हाररावाचें कर्जही बरेंच काढिलें होतें" ह्मणून **मल्हाररावाशीं** निष्कपटीपणानें शिंदा राणोजी वागे याचें इंगीत द्रव्यलोभ व ऋणको झाल्यानें येणारा मिंदेपणा असा राणोजींवर आरोप आणण्याचा यत्न केला आहे. ऑसाहेबांच्या मतें **राणोजीचा** होळकरांशीं स्नेह "निर्व्याज" नव्हता, मतलबी होता, असें आहे! बरें आहे. साहेब ह्मणतात तें कांहीं खोटें असावयाचें नाहीं असें ह्मणण्याखेरीज अन्य उपाय नाहीं. आपल्या पायांखालीं काय जळतें याची शुद्ध नसणाऱ्यांनीं इतरांची नालस्ती, आणि तीही खोटीनाटी करणें हें एक मानवी स्वभावाच्या योग्यतेचें दर्शक होय ! आमच्या देशाचे बहुतेक इतिहास इंग्रजांनीं लिहिले

---

१. **राणोजी**ला होळकरानें महत्पद लाभूं दिलें हा होळकराच्या कैफियतींतला मजकूर खरा मानला ह्मणजे **राणोजी**चा **मल्हार रावा**शीं कृतज्ञतेचा स्नेह होता हें उघड होतें. आणि असें असतां माल्कम साहेब ह्मणतात तें 'मिंदेपणाचा स्नेह' हें कारण पुळपुळीत असें कोणासही वाटणार आहे. कित्येक इतिहासकार आमच्या लोकांसंबंधानें लिहितांना "व्रणार्त पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे" असा प्रकार दाखवितात त्याचें हेंही एक उदाहरणच ह्मणावयाचें.

आहेत, पण ठिकठिकाणीं ते पक्षपाताचें जहर फांशीत सुटले आहेत. हा त्यांचा क्रम फार दुस्सह वाटतो; दुसऱ्याचे दोष आणि त्यांतही कित्येक नसते दोष–भराभर व मुद्दाम प्रसंग ओढून आणून दाखविण्याची हौस इंग्रज इतिहासकारांना फार असते याचें कारण काय असेल तें असो. आपल्या दोषांवर पडदा ओढण्याची ही एक अपूर्व कला असावी! असें नसतें तर इंग्रज इतिहासकारांनीं आह्मांबद्दल दोषैकदृक् होण्याचें कारण नाहीं! माल्कमसाहेब इंग्रजी राजांनीं, दोस्तगिरी आमच्या देशांत आजवर कशी गाजविली तें विसरून **राणोजीच्या** व **मल्हाररावाच्या** दोस्तीबद्दल असलें भलतें विधान करितात हें पाहून काय वाटणें शक्य आहे याचा उल्लेखही करणें नलगे! दोस्त तर ह्मणावयाचें आणि प्रसंग येतांच दुस्मानास करितां यावयाची नाहीं अशी कर्तबगारी दाखवावयाची, ही इंग्रजी दोस्ती माल्कमसाहेबांस माहीत असतां शिंदेहोळकरांच्या दोस्तीबद्दल असा खोटानाटा आरोप आणि बळेंच प्रसंग ओढून आणून आरोप करणें इंग्रज इतिहासकाराला ह्मणूनच शोभतें. अस्तु. एकंदरींत **राणोजी** कर्ता पुरुष, मर्द माणूस, भाग्यशाली व थोर मनाचा, व खरा सज्जन यांत कांहीं शंका नाहीं. हुजऱ्याचा राव बनला. चवरी ढाळण्याचें काम टाकून समशेरीनें शूरांस खेळवूं लागला तेव्हां, त्याच्या अंगच्या करामती, कौतुक व गुण वर्णन करावें तितकें थोडेंच होणार आहे.

**राणोजींस मिनाबाई** नांवाची एक विवाहित स्त्री व दुसरी रजपूत नाटकशाळेंतली औरत असे. विवाहित स्त्रीपासून **जयाप्पा, दत्ताजी** आणि **जोतीबा**[१] असे तिघे व नाटकशाळे-

---

१. हा **जोतीबा** विदुरवंशाचा असा उल्लेख रूलर्स आफ् इंडिया नामक मालेखालीं प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांतील महादजीच्या चरित्रां-

पासून **महादजी** व **केदारजी** असे दोघे मिळून पांच पुत्र होते. राणोजीच्या पश्चात् त्याची सरदारी **जयाप्पा** चालवूं लागला. तेव्हां त्याची हकीकत दुसऱ्या प्रकरणांत येत आहे.

---

## प्रकरण २ रें.

## २ जयाप्पा शिंदे.

कारकीर्द १० वर्षें इ. स. १७४५–५५.

**राणोजीच्या** पश्चात् त्याचा ज्येष्ठ पुत्र **जयाप्पा** हा शिंद्याच्या गादीवर व पेशव्याच्या सरदारीवर आला. त्याचे इतर बंधु त्याच्याच लष्करांत सरदारी पेशानें वागत. यामुळें शिंदे ह्मणजे पांच पुरुष अथवा "पांडव" असें ह्मटलें पाहिजे. लढाया, स्वाऱ्या, मोहिमा होत, त्या सर्व ठिकाणीं **जयाप्पा, दत्ताजी, जोतीबा, महादजी** व **केदारजी** हे हरहम्मेश असत. आणि यथाशक्ति त्यांनीं आपली समशेर चांगली गाजविण्यास कमती केलें नाहीं. एका आईच्या पोटीं आणि पाठीस पाठ लावून जन्माला यावें व एकाच घरांत व एकाच आईबापांच्या पंखांकालीं वाढून एका रक्तामांसाच्या बंधूंनीं दुस्मानासारखें वर्तन ठेवावें, भांडावें, वडिलांनीं जिवापाड मेहनत करून कळकळीनें दिलेल्या मालमत्तेचा उपयोग मी करतों, तूं करूं नको, मला हें दे, तुला तें घे ह्मणून भांडत सुटावें, आपल्या भांडणांत दुसऱ्यांना तळीरामगार करण्याची संधि साधूं द्यावी वगैरे प्रकारचें बेशरमी व बेअकली चोंचल्याचें आमच्या देशांत बाळकडू मिळत असतें तें या

---

तील वंशवृक्षांत केला आहे. कीने साहेब राणोजीस दोन औरस व तीन नाटकशाळेचे असे पांच पुत्र होते ह्मणतात व सरंजामे तीन औरस आणि दोन नाटकशाळेचे असें सांगतात ! तेव्हां यांतील खरें कोणतें ? संख्या तरी कायम आहे एवढेंच पुरे.

"शिंदे पांडवांच्या" वांट्यास तरी निदान आणि कांहीं वेळपर्यंत नव्हतें, असें ह्मणावयास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें एका कर्त्या पुरुषावर भार टाकून आपल्या आयदीपणाचा दिमाख मिरविण्यास संवकलेल्या गचाळासारखेंही या "पांडवांत" कोणी नव्हतें. मुख्य धनी जयाप्पा व त्याचे इतर बंधु नौकरच कीं काय अशा थाटानें वागत, यामुळें शिंद्यांचा वचक जास्त जास्त वाढत चालला. "नास्ति बंधुसमं बलं" ह्यास आंचवलेला जसा मल्हारराव होळकर तसे कांहीं शिंदे नव्हते. एकापेक्षां एक वरचढ असे चौघे बंधु जयाप्पाच्या पाठीवर होते, यामुळें हिंदुस्थानवन या नरशार्दूलांनीं चार दिवस दणदणाणून सोडलें. जिकडे ते जात तिकडे शिंद्यांची फत्तेच. माघार ह्मणून कोठें नाहीं. एकीकडून शिंदे "पांडव" आणि दुसरीकडून विचारा एकला मल्हारी होळकर असे ज्या वेळेस गर्जनांवर गर्जना ठोकीत आपल्या दुस्मनावर सूड उगविण्यास्तव चवताळून जात, त्या वेळीं बादशाही इतमाम भोगण्यास संवकलेल्या व पांच सहा शतकें भोगून धुंद झालेल्या यवनांची कशी गाळण उडत असे हें जाणणें कल्पनेलाच शक्य आहे. रजपूत, राठोड, शीख अशांसारखे युद्धकलाविशारद—रणधुरंधर, केवळ वाघासारखे क्रूर व हिम्मतवान व शूर पठ्ठे अशा या शिंदे पांडवांपुढें "आह्मीं निजतेजोमद याचि पुढें आज सर्व हारविला" असें ह्मणत स्तब्ध कसे बसले असतील, आणि पुण्यप्रतापी पेशव्यांनीं आपल्या या इमानी व नेकजात शूर सेवकांच्या स्वाधीन केलेल्या जरीपटक्याला किंवा भगव्या झेंड्याला इकडून तिकडे आणि तिकडून इकडे नाचतां नाचतां त्यांस कसें पुरे पुरे होऊन गेलें असेल याचें यथातथ्य वर्णन करण्यास धनुर्धारीची लेखणी समर्थ नाहीं. गेले ते दिवस! ते राजे आणि ते सरदार! आतां त्या वेळचे सौ-

भाग्यालंकार आठवतील तितके आठवून वैधव्यसागरीं बुडतां बुडतां काय टिपें गाळण्याची संधी साधेल तेवढीच खरी. असा प्रसंग आला आहे.

**कुंभेरीचा हल्ला.** **जयाप्पा** पेशव्यांचा नौकर, पेशव्यांस हिंदुस्थानावर, अटकेपर्यंत, हिंदुपदपातषाही मिरविण्याची ईर्षा होती. त्याप्रमाणें पेशव्यांचा भाऊ **राघोबा** भरारी दौडांवर दौडा मारीत हिंदुस्थानांत शिरला. बरोबर त्यांचे अनेक सरदार होतेच. श्रीमंत पेशवे साक्षात् विष्णूसारखे (शिंदे, होळकर, विंचूरकर आणि पटवर्धन हे त्यांचे चार सरदार—अशा सरदारांच्या योगानें) चतुर्भुज तेव्हां त्यांच्या पुण्यप्रतापानें दिनदुनया दिपे यांत नवल कोणतें ? **राघोबा** अटकेवर झेंडा मिरवावयास निघाले, तेव्हां बरोबर हे सरदारही होतेच. नर्मदा पार होतांच दक्षिण संपून उत्तरहिंदुस्थान लागतें. हिंदुस्थानच्या मोहिमेस निघालेल्या या मराठ्यांस प्रथमतः **कुंभेरी**च्या जाटांचा मुलूख दिसला. तिकडे त्यांची दृष्टि वळली. मराठ्यांची आपणाकडे दृष्टि वळली ह्मणतांच बिचारा जाट, हाडाचा, स्वभावाचा, छातीचा सिंह—पण मराठ्यांपुढें—मेंढरासारखा गरीब झाला. 'खंडणी देतों ती घ्या आणि आपल्या वक्र दृष्टींतून मजला सोडवा' असा **जाटानें** मराठ्यांस निरोप पाठविला. **राघोबा** मर्दगडी. महत्वाकांक्षी जबरा. जाट भ्याला असें पाहिलें तेव्हां त्याची "दृष्टि थोर झाली"! एक कोट रुपये खंडणी मागूं लागले. जाटाचा वकील चाळीस लाख देतों ह्मणे. पण मराठे ऐकेनात तेव्हां त्यानें

---

१. डफ साहेबांनीं मराठ्यांचा संपूर्ण इतिहास लिहिला आहे. त्यांत पुढें सांगितली ही हकीकत नाहीं. ती बखरींतून आढळते. **जाटा**शीं मराठे लढले व किल्ल्यावर मराठ्यांचा हल्ला होता ही गोष्ट इंग्रजी इतिहासांतून नमूद झाली आहे. ग्र्यांटडफ ह्मणतात जाटानें मराठ्यांस **सात**

रोकडा जबाब पाठविला कीं "चाळीस लक्ष रुपये देतों ते घेण्यांत यावे नाहीं तर युद्धास उभें राहावें." दादासाहेब मानी पुरुष. त्यांच्याकडून तयारी होतीच. त्यांनीं एकदम कुंभेरीस मोर्चा लावून दिला. जाटाशीं गांठ. सुरजमल्ल जातीनें लढणारा. कुंभेरीचा किल्ला रेताड मुलूख आणि मराठ्यांनीं तेथें मर्दुमकी गाजविण्याचा निश्चय केलेला! महिना दीड महिना मोर्चा लावून

---

लाख रुपये दिले व बखरींत "वकील यांचें बोलणें निदान चाळीस लक्ष रुपयेपर्यंत झालें" असें स्पष्ट म्हटलें आहे. इंग्रज इतिहासकारांचा लेख खरा मानण्यापेक्षां बखरकारांचाच खरा मानणें रास्त दिसतें. कारण इंग्रजी इतिहासकारांस आंव घालतां येतो तशी कृती लेखांतही दाखविणें महामुष्किलीचें काम वाटून आपली प्रौढी व इतरांचा होतां होईल तितका पाणउतारा करावा असें त्यांचें हरवक्ती आचरण असतें. इतरांचा गुणानुवाद गाणें यात एक प्रकारचा जणों आपला अपमानच होतो अशा तऱ्हेची त्यांची चमत्कारिक वृत्ति सर्वत्र स्पष्ट व स्वच्छ आढळते. बखरी आमच्या लोकांनीं लिहिल्या तेव्हां त्या जास्त विश्वसनीय असण्याचा संभव कमी असें वाटणें सर्वथा गैर नव्हे. खरें आहे. परंतु आमचे बखरी लिहिणार अखबरनवीस आणि पवाडे गाणार शाईर सुद्धां आपल्या अपजयाचें वर्णनही बेमुरवत व सुरेख करितात, केल्याचीं शेंकडो उदाहरणें धडधडीत आढळतात, तसा प्रकार इंग्रजी इतिहासांतून सहसा मिळावयाचा नाहीं. अशा विधानाच्या सत्यतेबद्दल उदाहरणें इतिहासवाचकांस देण्याची जरूरी नाहीं. प्रसिद्ध पोवाड्यांचे भक्त आकर्थ यांनीं पवाडे रचणाऱ्या शाइरांच्या निःपक्षपातीपणाबद्दल सुरेख स्तुति केलेली आहे. तशींच काव्येतिहासांतून निघालेल्या बखरींचीही स्थिति आहे. मराठ्यांच्या पराजयाचें नव्हे त्यांनीं केलेल्या गनीमी काव्याचें आणि फंदफितूरीचें सुद्धां बारीकसारिक वर्णन बखरींत सादर दिलेलें आहे. बिचारे अखबरनवीस भोळे! त्यांना खांचाखोंचा भरून काढण्याची पक्षपाती शक्कल किंवा अशा धोरणाच्या फायद्याचा परिणाम कसा व किती लांबवर जातो याची माहितीच नसे, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं!

बसले तरी मराठ्यांना किल्ल्यावर तोफा लागू करितां येईना. कारण किल्ल्यावर तोफेचा मारा सुरू करणेंच अति दुर्घट काम होतें. सुरुंग लावून किल्ला उडवितां येईना. वाळवंटांत सुरुंग लावण्याला अवश्य ते दगड कोठून आणावेत? "तोफ नीच धरली तर गोळा कुंभेरीचे पार होऊन" आपल्याकडीलच मनुष्य जायां होतात असें संकट मराठ्यांस प्राप्त झालें. अशाखालीं सबंध सहा आठवडे गेले. तों इतक्यांत सुभेदार **मल्हारराव होळकराचा** पुत्र **खंडेराव,** जाटाकडील गोळी लागून ठार झाला, **मल्हाररा**वाला पुत्रशोकाचा धक्का फार जोरानें पोंचला, त्याबरोबर संतापास येऊन **मल्हाररावानें** प्रतिज्ञा केली कीं "सुरजमल्ल याचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरीच जन्मास आल्याचें सार्थक. नाहीं तर प्राणत्याग करीन!" **मल्हाररावाची** कदर हिंदुस्थानच्या तमाम राजेरजवाड्यांस माहीत होतीच आणि त्यांतून जयद्रथवधाबद्दल सव्यसाची धनंजयानें दुर्धर प्रतिज्ञा केली तशीच **मल्हाररावानें** या प्रसंगीं केली हें कर्णोपकर्णी **सुरजमल्ल जाटास** कळलें. तेव्हां त्याचा धीर सुटला. फणेवर पाय ठेवून नागाला चिडवावें असें झालें ह्मणून जाट आपल्या जागींच दिङ्मूढ झाला. त्याचें धाबें दणाणून गेलें तों इतक्यांत किल्ल्यांतील शिधासामुग्रीही संपली तेव्हां "गनीम—मराठे—मागतील तितके रुपये द्यावे किंवा बायकामुलें यांचा त्याग करून चालून घेऊन मरावें" याखेरीज अन्य कोणताच मार्ग दिसेना. जाटाची ज्येष्ठ स्त्री **अनुसूया** मनसुबेदारबाई होती; तिनें "गोष्ट तों साधेना, मसलत सुचेना प्राणाचा समय गुदरला" असें पाहून सल्ला दिली कीं "राजेश्री **जयाजी** शिंदे यांचा आणि तुमचा स्नेह आहे. तेही सत्क्रियावान् एकवचनी आहेत. त्यांस साध्य केलियास तुमचा तरुणोपाय आहे" ही मसलत सर्वांस आवडली. राणीवशांत

आणि शत्रूंसारखा दंड थोपटून झुंजावयास येणाऱ्याच्या तोंडून "**सत्क्रियावान्**" "**एकवचनी**" असा **जयाप्पाचा** लौकिक व्हावा ही गोष्ट खरोखर भारी कौतुक वाटण्याजोगी आणि अभिमानास्पद आहे. इंग्रज इतिहासकार आमच्या सरदार मंडळीच्या "लुटारू व दंगेखोर" पणाचा यळकोट गाऊन थकतात तेव्हां अशासारखीं, अनुसूयेचीं "सर्टिफिकिटें" त्यांच्या नजरेस आणणें अत्यावश्यक आहे. "लबाडी" व "लुटारूपणा" हे मराठी सरदारांचे उपजत गुण असा माल्कम साहेबांनीं आपल्या इतिहासांत शेरा मारला आहे ! लोकांच्या डोळ्यांतील कुसळें काढण्यांत व आपल्या डोळ्यांतील मुसळें लपवून ठेवण्यांत ज्यांचा अगदीं हातखंडा असे परोत्कर्षासहिष्णु, परनिंदक व परनिंदेनें आपला टेंभा मिरविणारे पक्षपाती, मत्सरी आणि सत्यापलापी इंग्रज इतिहासकार कांहींही ह्मणोत पण त्यांच्या त्या विधानांवरच आह्मींही आपल्या समजुती बदलणें नादानपणाचें 'बायकी' कृत्य होईल. एवढें विषयांतराचें पातक उचलून, ठांसून सांगणें अत्यावश्यक आहे !

जाटपती **अनुसूया** इनें सल्ला दिली त्याप्रमाणें एके दिवशीं रात्रीं **तेजरामकटारी**–जाटाच्या वकीलाचा मुलगा–जाटाच्या शिरची पगडी घेऊन **जयाप्पाच्या** डेऱ्यांस आला. आणि केवळ लाचारपणानें शिंद्यास जाटवकील बोलला "आजचे समयीं तुह्मी वडील बंधु आणि मी धाकटा बंधु आहें. कळेल त्या रीतीनें बचाव करावा" आणि लगेच जाटाची पगडी शिंद्याच्या डोकीस घालून शिंद्याची जाटास नेणेकरितां घेतली. एकमेकांची पगडी एकमेकांनीं दिलीं घेतली तर त्याला "**पगडीभाई**" ह्मणतात. पगडीभाई झाल्यावर "पोटाचें द्यावें पण पाठीचें देऊं नये" असा हिंदुस्थानांत दस्तूर आहे. यामुळें शिंद्यावर एक हें

मोठेंच संकट गुजरलें ह्मणावयास हरकत नाहीं. जाटाचा पक्ष धरला तर स्वामिद्रोह आणि मित्रद्रोह यावयाचा, न धरावा तर इमान दिलेलें ठार बुडतें अशा संकटांत **जयाप्पा** पडले. लहान थोर मुत्सद्दी मंडळी जमवून सर्वांचा सल्ला **जयाप्पानें** विचारिला, परंतु त्यांचीही नेकजात नात पडली. शरण आला, यास मरण कसें चिंतावें ह्मणून शिंद्याच्या पदरची तमाम मंडळी उघड ह्मणत. तेव्हां शिंद्यास केवळ इमानाकरितां स्वामिद्रोह व मित्रद्रोह पत्करण्याचे दुःखद प्रसंग निमूटपणें सोसावे लागले! जाटाला अभयपत्र शिंद्यानें पाठवून खातरजमा केली कीं न डगमगणें तों इतक्यांत शिंदे, व जाट पगडीभाई झाल्याचें वर्तमान होळकर **मल्हाररावांस** कळलें. तेव्हां त्यांचा संतापसागर उचंबळूं लागला! "आमचे अस्तनींत अग्नी आणि जाट कसचा साध्य होतो" असें तिरमिरीनें **राघोबास मल्हारराव** बोलले. तेव्हां राघोबा जागच्याजागींच थक्क झाला. ब्राह्मणपाच्छाईंतला सबंध शाहाणा **सखाराम बापू** या वेळीं दादासाहेबांचा मुख्य मंत्री त्यानें **राघोबांची** खात्री केली कीं "साहेबांचें अनहित शिंद्यांच्या हातून व्हावयाचें नाहीं ते स्वामींचें कल्याणच करतील." होळकर दुखवावा तर शिंदे बिघडतात आणि शिंदे संभाळावे तर होळकर रागावतात, अशा संकटांत **राघोबा** पडले. शिंद्यांचें ह्मणणें जाटाकडून खंडणी येते ती घ्यावी. आणि **मल्हारराव** जाटाची गर्दन उडवीन ह्मणून प्रतिज्ञा करून बसले होते. जाटाला दम निघेना. तो **शिंद्यांस** तगाद्यांवर तगादे करून विनवणी करी कीं "सल्ला करा किंवा आह्मांला मारून टाका" तेव्हां शिंद्यालाही संकट आलें. पेशव्यांपुढें जाऊन काय बोलावें? ते काय ह्मणतील? होळकरांस कसें वाटेल? इत्यादि संकटांत शिंदे. परंतु एकवार घट्ट जीव करून शिंदे **राघोबाच्या** डेऱ्यास गेले.

आणि ह्मणाले "आह्मी धणियाचे बारगीर निमकहराम नव्हों असें असतां आह्मी जो जाबसाल सांगतों तो खाविंदांचे मर्जीस येत नाहीं. आजचे समयीं जाटांपाशीं खंडणी घेऊन पुढें मसलत फत्ते करावी." शिंद्यांच्या बोलण्याचा रोंख दादासाहेबांनीं ओळखला. परंतु त्यांना शिंद्यांचें ह्मणणें मान्य करवेना. कारण असें केल्यानें होळकरांची मर्जी खप्पा होईल. प्रसंगीं बेमुर्वतीनें हातचे निसटतील. त्यांनीं घोरतर प्रतिज्ञा केलेली राघोबांस ठाऊकच होती. तेव्हां तुह्मी सांप्रत डेऱ्यास चला मागाहून काय तो निरोप पाठवितों, असें राघोबांनीं जयाप्पास सांगितलें. तों इतक्यांत जयाप्पाला दुसरी एक पगडीभाईची संधी आली तेव्हां राघोबांकडे शिंदे गेले आणि ह्मणाले. "तुह्मी थोर खाविंद अहां आपण या स्थळीं राहून जाटाचें पारिपत्य करावें. आह्मांस आज्ञा द्यावी आह्मी मारवाड प्रांतीं जातों." एवढ्यावरच शिंदे थांबले नाहींत. "राजीखुशीनें निरोप दिला तरी उत्तम नाहीं तर आपणास साफ राहातां पुरवत नाहीं"असें ह्मणून तडक

---

१. मराठे सरदार इमानाकरितां अनेक वेळां असलीं संकटें सोसण्यास तयार असे कैक दाखले इतिहासांत आहेत परंतु असें असूनही लहान थोर इंग्रज इतिहासकार त्यांच्या कपाळावर "लबाडी" "विश्वासघात" वचनभंगाची बेपरवाई असलाले टिळे लावीत सुटतात याजबद्दल वारंवार त्यांच्या हट्टवादी खोटसाळपणाचा साहजिक तिटकारा येतो त्याजपेक्षां, ते खोटसाळपणाचे कुटिल आरोप खरे मानून बोलणाऱ्या व वास्तविक प्रकार काय आहे, काय असावा हें जाणून घेण्याची साहजिक लालसा नसणाऱ्या आयदी अभिमानशून्य व मूर्ख अशा आमच्या मेषपात्री मंडळीचा जास्त संताप येतो, व येणें साहजिक आहे. आंग्ल सार्वभौमांनीं "दोस्तगिरी" आणि "कृतज्ञता" यांचे पाझरलेले प्रताप पाहवेत आणि आमच्या आडदांड व भोळसट सरदार मंडळीची इमानगिरी आणि सेवाभक्ति पाहावी ह्मणजे अमावास्येच्या रात्रीं पडलेली काळी

चालते झाले, व कुचाचा नगाराही शिंद्याच्या छावणींत सुरू झाला. आतां पुढें काय करावें हे **राघोबांस** सुचेना. त्यांनीं होळकरास बोलावून आणून ह्मटलें "शिंदे कुच करून चालले. तुह्मी वडील आहां. आह्मांस मनसबा कोणता देतां" तेव्हां प्रसंग जाणून **मल्हाररावानें** आपली प्रतिज्ञा माघारी घेतली आणि शिंद्यांच्या हातून जाटाशीं सल्ला करावी असें सांगितलें आणि त्याप्रमाणें राघोबांनीं केलेंही.[१]

**मारवाडची मोहीम. आणि मृत्यु:**—मांरवाडचा राजा **अजितसिंग**.[२] त्याला **अभयसिंग** व **बखतासिंग** असे दोन पुत्र होते. **अभयसिंग**[३] बापाच्या पश्चात् गादीवर बसला. तो इ. स. १७५० मध्यें वारला तेव्हां त्याचा मुलगा **रामसिंग** गादीवर यावयाचा. पण त्याच्या चुलत्यानें ती गादी आपण बळकाविली. परंतु तीन वर्षांतच ह्मणजे १७५३ सालीं तो **बखतासिंगही** वारला. बखतसिंगाची गादी आपणास मिळावी ह्मणून

---

मिचकूट प्रभा व पौर्णिमेची शीतळ जोत्स्ना यांच्यांतील अंतराइतकी तफावत केवळ, अंधळ्यासही दृग्गोचर होईल यात शंका नाहीं. आणि असें असूनही इंग्रज इतिहासकारांचे लेख सत्यप्रमाण व त्याची ओळख करून देण्याचे प्रयत्न "एकतर्फी व असमान बुद्धीचें लक्षण ठरतात!" आणि ठरतात हेंही रास्तच. कारण देशी तेलंग न्यायमूर्ति बाष्कळ लेखाचें खंडण करणाराच बाष्कळ ह्मणून सांगतात!!

१. ही सविस्तर हकीकत ग्र्यांटडफ यांच्या इतिहासांत नाहीं,, कारण ती देण्यांत त्या इतिहासकारांचा फायदा कोणता, शिंद्याची वचनैकनिष्ठता, होळकरांची स्वामिसेवापरायणता, इत्यादि लोकोत्तर सद्गुण बाहेर पडले तर काय करा? हाच त्यांचा मतलब.

२. याला त्याच्या विलक्षण पराक्रमावरून कडवे मुसलमान **ढोकलसिंग** ह्मणजे संहारकर्ता असें ह्मणत.

३. पिलाजीराव गायकवाडास मारेकरी घालून मारलेला रजपूत राजा तो हाच.

त्याचा मुलगा बिजेसिंग प्रयत्न करी. मी अभयसिंगाचा वडील मुलगा. माझी गादी चुलत्यानें बळकाविली ती आतां चुलत भावास लाधूं देऊं नये असें रामसिंगाचें ह्मणणें होतें. चेतराम ह्मणून रामसिंगाचे पदरीं वकील असे त्यानें रामसिंगास सल्ला दिली कीं मराठ्यांचें सहाय्य घे ह्मणजे तुझें काम फत्ते होईल. मराठ्यांपैकीं शिंदे होळकर हिंदुस्थानांत माहीत. पैकीं होळकर बिजेसिंगाच्या तर्फेचा हें चेतरामास माहीत होतें. आणि त्याचप्रमाणें कुंभेरी मुक्कामीं शिंदेहोळकरांचीं मनें बिघडलीं हेंही चेतरामास कळलें. ह्मणून रामसिंगाकडून शिंदे जयाप्पाशीं चेतरामानें पगडीभाई करविली. त्यामुळें रामसिंगास गादीवर बसविण्याकरितां शिंदे मारवाडाकडे निघाले. रामसिंगाचा पक्ष घेऊन शिंदे येत आहेत असें पाहतांच बिजेसिंगानें लढण्याची तयारी केली. बिजेसिंग रजपूत. साऱ्या दुनयेंत शूर ह्मणून नाणावलेले. मराठी बखरकारही ह्मणतात "धन्य ! रजपुतांची माय रजपुतांसच व्याली." मारवाड प्रांतीं दस्तूर हाच कीं समूर घाव घेतला तरी उत्तम नाहीं तर पुरुषाचें स्त्रियांनीं मुखावलोकन करूं नये. "रजपूत स्त्रियांची हिम्मत या रीतीची तेथें पुरुषांची शिफारस कोठवर ल्याहावी !" खुद्द शिंदे जयाप्पा आपल्या लोकांस बोलले ह्मणून बखरकार सांगतात त्या भाषणांत "मारवाडी हटेले रजपूत महापराक्रमी, शिरच्छेद झाला तरी कबंध नाचतें" असें ह्मटलें आहे. कर्नल टॉडसाहेबांनीं तर रजपुतांच्या शौर्याचें महाभारत रचिलें आहे. अशांशीं आमच्या मराठ्यांची गांठ पडली. मराठी बखरकारांनीं उभय सैन्यसंख्या दिली आहे. मात्र इंग्रज इतिहासकारांचा अभिमान. दुरभिमान व आंकडे सांगतांनाचा "पर्डेगा प्रपंच" बखरलेखकांत दिसून येत नाहीं.

रजपुतांकडे "पंधरा हजार फौज व दहा हजार पायदळ व पन्नास तोफा व पंचवीस गंजीफिदाच्या गाड्या व शंभर उंट, बाणांच्या कैच्या पांचसातशें. उंटावर सुतारनाले, व जेजाला व बरकंदाज" असत. मराठ्यांकडे सडी "तीस हजार फौज होती." उभय सैन्यांत दहा कोशांचें अंतर होतें. एकदम लढाईची सुरवात न करितां सामदामानें काम होईल तर पाहावें हा जयाप्पाचा विचार होता त्याप्रमाणें रामसिंगास गादी दे किंवा आपसांत तंट्याचा निकाल कर असें जयाप्पा शिंद्यानें बिजेसिंगास प्रथमतः पत्र लिहिलें. तेव्हां त्या पत्राचा कसा काय उपयोग झाला हें टॉडसाहेबांच्या वर्णनावरून चांगलें कळून येईल. "तें पत्र आल्याचें वर्तमान कळतांच अरे हा हप्पा कोण ? त्याची काय आह्मांला पर्वा, आकाश कोसळूं लागलें तरी तें मस्तकावर धरून आह्मी आमच्या राजाचें संरक्षण करणार" असें आरडून रजपूत ह्मणूं लागले. अप्पाच्या या पत्राची रजपुतांनीं निव्वळ हेटाळणी केली. ती कांहीं शिंद्याला सहन झाली नाहीं. सामाचा उपयोग होईना तेव्हां प्रकरण अर्थात दंडावर आलें. मराठे आणि रजपूत यांची गांठ पडली. बिजेसिंगास आणखी तीन "भूपती" सहाय्य होते. मराठे कांहीं नाणावलेले फार दिवसांचे शूर नव्हत. शेतीभातीवर किंवा लहानसान शिलेदारींत गुजराणा करीत दारिद्र्यपंकांत रुतलेली खिरट्या शरीराची मराठ्यांची जात. रजपूत ह्मणजे सारे सिंह. पिढीजाद लढवय्ये. आणखी समरभूमी

१. हे रणसंग्रामांतले पारिभाषक शब्द देखील त्याच मराठ्यांचे असल व औरस वंशज जे आह्मी ते विसरलों आहोंत. बंदूक किंवा तोफ यांचें दर्शन आह्मांस घ्यावयाचें तर इंग्रजी कोशांतील चित्रें पाहण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं, अशी स्थिति झाली आहे ! याचें नांव नशीब.

२. मारवाड. बिकानेर व किसनगड येथील राजे हे तीन भूपती.

रजपुतांचे राज्यांत. राक्षस आणि मानव यांचें युद्ध तशांतले मराठे व रजपूत यांचे शरीराकडे पाहून युद्धाचा परिणाम ताडूं इच्छिणाऱ्यांस वाटण्याजोगें होतें. लढाई दोन दिवस झाली. पहिला श्रीगणेशा तोफांनीं सुरू केला. मराठ्यांनीं पहिला दिवस मोठ्या शिकस्तीनें पार पाडला ह्मणावयाचा. कारण त्या दिवशीं जय मिळेल असें कांहीं मराठ्यांस वाटलें नव्हतें. मनुष्य प्रयत्न करीत असतो त्याला ईश्वर सहाय्यकारी असला ह्मणजे सर्वच प्रकार कांहीं विलक्षण घडतो. बिजेसिंगाची निवडक पांच हजार स्वारांची टोळी कुमक करण्याला ह्मणून येत होती. पण दुर्दैव रजपुतांचें यामुळें ही शत्रूची टोळी असें समजून त्यांजवर बिजेसिंगानें तोफा डागण्याला सुरवात केली! त्या टोळीचा पुरा निःपात झाला तेव्हां अरे ही आपली सेना आणि आपल्या हातून हा काय प्रमाद घडला असें रजपुतांस वाटलें! ईश्वरी क्षोभाचें हें लक्षण. तेव्हां कांहीं आतां आपली धडगत नाहीं अशी ठाम समजूत रजपुतांची झाली आणि त्यामुळें रजपुत सैन्यांतला उत्साहच नष्ट झाला. इतक्यांत, आतां आपण लढूं नये अशी सल्ला बिजेसिंगास त्याचे मंत्री देतात, ही अफवा बाहेर फुटली. तथापि हाडाचे ते रजपूत लोक, दुसरा दिवस त्यांनीं मोठ्या निकरानें लढण्यांत घालविला. मराठ्यांच्या सैन्यास दे माय धरणी ठाय असा प्रसंग रजपुतांनीं आणून सोडला. परंतु मराठ्यांच्या छातीची मजबुतीच विलक्षण, ते कशालाही डगमगणारे नव्हते. "बाणांचा वर्षाव मेघाप्रमाणें झाला. मोठा कडाखा उडाला. धुराची धुंदी झाली कोणाचें तोंड कोणाचें दृष्टीस पडेनासें झालें. धडाक्याखालीं घोडे, मनुष्यें बाहेर गेलीं. क्षणभर अशी गर्दी होऊन दोहींकडून हर हर ह्मणोन घोडे घातले." आगीचा प्रलय संपतो न संपतो तोंच हातघाईवर प्रसंग आला. रजपूत

धिप्पाड शरीराचे. मराठे बेटे बुटके, रोडके, त्यांचा सप्पा रजपूत केव्हांच उडवितें. पण हरीचा छावा आणि मदोन्मत्त दांडगा गज, यांची झोंबी लागली असतां शुंडादंडाचा किंवा त्याच्या धिप्पाड शरीराचा हरिनखांपुढें कांहीं उपयोग होत नाहीं. तसाच प्रकार या मराठेरजपुतांच्या लढाईत झाला ह्मणावयास हरकत नाहीं. "पांचसातशें भले चांगले लोक गनीमाकडील ठार झालें. जखमी घायाळ दोन अडीच हजार मनुष्यें झालीं. पांच सातशें घोडींही पडलीं" तरी मराठे चवताळून रजपुतांवर चाल करून जात. असें घटका दोन घटकाभर चाललें तोंच रजपुतांनीं समरभूंतून माघारी पाय घेतला. रजपूत अस्सल क्षत्रिय समरांगण सोडून पळणें यालाच पराभव समजत नाहींत. "जसा मोटेचा बैल सरतो तसे मार खातच" रणांगण सांडून रजपूत बाहेर पडले. तेव्हां आपणांस फत्ते मिळाली ह्मणून मराठे जयघोषांत दंग झाले[१]. असा मोठा जय मिळवून मराठे माघारे शहरांत

---

१. कर्नल टॉड या धीरोदात्त साहेबानें रजपूत लोकांचा फार सुरेख इतिहास लिहिला आहे. त्यांत मराठ्यांनीं रजपुतांचा हा पराभव केला त्या प्रसंगाचें वर्णन करितांना भारती युद्धांतल्या द्रोणाचार्यास नरो वा कुंजरो वा ह्मणून पांडवांकडून दगलबाजी झाली तसाच प्रकार रजपूत सेनेंत घडल्याचें लिहिलें आहे. सरदारसिंग ह्मणून कोणी राजा शिंद्यास येऊन मिळाला होता. त्यानें आपला एक माणूस बिजेसिंगाच्या लष्करांत पाठवून "अरे तुह्मी आतां कोणाकरितां लढतां ? बिजेसिंग तो केव्हांच ठार झाला" अशीं हूल शिपाई लोकांत पाडली. आणि त्यामुळें रजपूत लश्कर पळत सुटलें. रजपूत लढत असतां "जयाप्पा पराजयाच्या भीतीनें पळून जावयास सुद्धां तयार झाला होता" वगैरे माहिती साहेबांनीं दिली आहे. आपल्याच टोळीला आपण ठार केलें हा मोठा अपशकुन झाला. बिजेसिंग पळता पाय घेण्याचा विचार करीत आहे आणि मग तो ठार झाल्याची हूल पडली यामुळें मराठ्यांस यश मिळालें असें दा-

बिजेसिंग होता त्याला वेढा देऊन बसले. सातआठ महिने झाले पण शहर हस्तगत होण्याचें कांहीं लक्षण दिसेना. तेव्हां जयाप्पानें असा विचार केला कीं, सर्वांनीं एकजागीं राहणें ठीक नव्हे, यास्तव सैन्याचा कांहीं भाग आपला पुत्र जनकोजी याच्या स्वाधीन केला आणि त्याची मेडतियाकडे रवानगी केली.

बिजेसिंगाला मल्हारराव होळकर कुमक करील ही आशा फार होती परंतु "शिंदे आह्मी एका खाविंदाचे चाकर तेव्हां उघड तुमची कुमक आह्मांस करतां येत नाहीं." असें मल्हाररावांकडून

---

खविण्याचा मनांत हेतु धरून साहेबांनीं प्रयत्न केला असावा असें दिसतें. रजपूतांप्रमाणेंच, दक्षिणीं मराठ्यांनीं आपल्या मर्दपणाची शर्थ केली असा साहेबांचा मोघम उद्गार आहे. परंतु मराठ्यांस जय मिळाला तो अशा कारणामुळें असा मोघम ध्वनि व्यक्त होतो ह्मणून त्याच्याबद्दल जास्त विचार करावयाचा. रजपूत गनींम नव्हत. बाणेदार क्षत्रिय. त्यांच्यासारखे तेच शूर ही गोष्ट कोणीही कबूल करील. त्यांस समरभूंतून पाय काढण्यापेक्षां मरण बरें वाटे. पराजयाच्या भीतीनें बायकापोरांस आपण आपल्या हातें जाळून कंठस्नानाकरितां धारातीर्थीं जाणाऱ्यांस वर सांगितले कारणामुळें समरभूंतून पळून जावें लागलें असें क्षणभरही मानणें फार चमत्कारिक दिसतें. सरदारसिंगानें कपटप्रयोग केला असें नाहीं. परंतु रजपूत भाट सुद्धां

"याद घणा दीन आवोशीं; "हाप्पा" वाला वेल ॥
भागा तीनो भूपती; माल खजाना मेल ॥ १ ॥"

असें त्या प्रसंगाचें कवनांतून वर्णन करितात. तेव्हां मराठ्यांनीं आपली मर्दुमकी बरीच गाजविली यांत बिलकूल शंका नको. बाकी टॉड यांना रजपूत भारी प्यार वाटत त्याचा हा परिणाम. एवढेंच खरें. भाटाच्या तोंडच्या वर्णनाचा अर्थ अप्पाच्या वेळची आठवण फार दिवस राहोल असा आहे. तो अर्थः—"आपलें सामानसुमान व जवाहीर टाकून तीन भूपती पळून गेले."

अखेरचें पत्र आलें, तेव्हां मात्र बिजेसिंगाची खात्री झाली. मल्हाररावानें असें पत्र दिलें व आपल्या घरोब्याच्या इतर रजपूत राजांस साहित्यपत्रें बिजेसिंगास सहाय्य करण्यास पाठविलीं, मराठी बखर लिहिणारानें "तुह्मीं ठांसून राहावें ह्मणजे त्यांच्यानें रोमहर्षण होणार नाहीं. असें करितां तुह्मांस कोणी मदत न करील, तरी कांहीं **मोंगलाई मसलत** करून तुह्मीं यश संपादावें" असें मल्हारराव "वकिलास हिंमत देऊन बोलले" असा उल्लेख केला आहे. दुर्दैवानें बिजेसिंग लौकरच "मोंगलाई मसलत" पार पाडण्यास उद्युक्त झाला आणि त्यांत त्यानें यशही संपादलें. तेव्हां ह्या सल्लेबद्दल होळकरावर शिंतोडा बराच येण्याचा संभव आहे. परंतु मल्हाररावानें अशी सल्ला वकिलास दिली असेल असेंच मुळीं घडणें कठीण दिसतें. मल्हाररावाचें व शिंद्याचें मन शुद्ध नव्हतें. गोष्ट खरी आहे. परंतु तेवढ्यावरून अशी सल्ला मल्हाररावानें सुचविणें त्याचा स्वभाव व वर्तनक्रम ह्यांस विरुद्ध दिसतें. शिवाय **कर्नल टॉड** यांनीं बिजेसिंगाकडून वकील पाठविला असा कोठेंच उल्लेख केलेला नाहीं. या व दुसऱ्या अशा अनेक कारणांमुळें मल्हाररावाचा हा कांहीं कानमंत्र नव्हे, मागें पिलाजीराव गाईकवाडाशीं "मोंगलाई मसलत" या रजपूत शूरांनीं लढविली होती तिलाच अनुसरून बिजेसिंगानें हा भागूपणाचा कावा केला असावा असा तर्क लढविण्यास जागा आहे. समग्र चौदा महिने लोटले तरी शत्रु बोकांडीवर बसला तो उठेना असें पाहून बिजेसिंगाच्या दरबारांत "मोंगलाई मसलत" लढवून गनीम उधळून लावण्याची शक्कल निघाली. चौघे मारेकरी तयार करून बिजेसिंगानें जयाप्पाच्या छावणींत पाठविले. स्नान करून जयाप्पा तोंडावर धोतर घेऊन डोकें पुशीत आहेत अशी संधी साधून त्या मारेकऱ्यांनीं जयाप्पाच्या दोहीं

कुशींत आपल्या सुऱ्या भोंसकल्या! दाणे टिपणाऱ्या भिकाऱ्यांच्या वेषानें हे मारेकरी छावणींत शिरले होते! सुऱ्या भोंसकतांच जयाप्पा चौरंगावरून धाडकन भुईवर खालीं पडले. जवळ दत्ताजी बंधु होता त्यानें बहुत शोक चालविला. तों इकडे बिजेसिंगानें आपली मसलत पार पडली हें कळतांच, सैन्य सिद्ध करून जयाप्पा शिंद्याच्या लष्करावर चाल केली. "मुरगी मरगई बचडे दाणादाण" अशांतला प्रकार शिंद्यांचा होईल अशी हिम्मत बिजेसिंगानें आपल्या लष्करास दिली होती. रजपूत लष्कर शिंद्यावर चालून आलें आणि इकडे जयाप्पा जखमी आणि ह्मणून त्यांचे बंधु दत्ताजी शोकाकुल होते. शत्रूनें याच वेळीं उचल केल्याची चाहूल शिंद्याच्या लष्करांत कळली. परंतु खुद्द मालक असे विपन्नावस्थेंत तेव्हां पुढला मनसबा कसा, या विवंचनेंत जो तो होता. तों इतक्यांत आपला बंधु रडत आपल्या शेजारीं बसला आहे असें पाहून घायाळ जयाप्पा ह्मणाला "वैरी युद्धास आला आणि तूं रांडेसारखा रडतोस? हें क्षात्रधर्मास उचित नाहीं. आतां मजला कांहीं होत नाहीं. तुह्मीं शत्रूचा पराभव करावा." असें बंधूचें बोलणें ऐकून तसाच दत्ताजी घोडेस्वार झाला आणि गराडा घालावयास आलेल्या शत्रूवर तुटून पडला. रजपूत मराठे यांची पुनः समरांगणीं गांठ पडली. आपणांस जय मिळेल ही रजपुतांस खात्री, आपला मालक घायाळ झाला त्याचा शोकाकुल भाऊ, मर्मभेदी भाषण ऐकून लढण्यास तयार झाला. तेव्हां ईशसत्ता कशी आहे कीं, ही मराठ्यांस धास्ती होती. परंतु नाहीं. मराठ्यांनीं चवताळून नरडीचा घोंट घ्यावयास भुकेलेला वाघ धांवतो तसा हल्ला रजपुतांवर केला! त्यांच्यानें मराठ्यांचा मारा सहन करवेना. जयाच्या आशेनें आलेल्या रजपुतांस खजील होऊन रणांगणांतून पळण्याखे-

रीज अन्य मार्गच या वेळीं नव्हता. फत्ते मिळून मोठ्या जयघोषानें मराठे छावणीकडे यावयास निघाले तों वाटेंतच जयाप्पा कैलासवासी झाल्याचें वर्तमान त्यांस कळलें. दत्ताजीबुवांच्या दुःखास पारावार नाहींसा झाला. मालिक पेशवे यांस जयाप्पाच्या मृत्यूची वार्ता कळली तेव्हां " आमचा अर्जुन गेला. एक बाजू खचली" असें ह्मणून बहुत कष्टी झाले ! आपल्या बंधूनें फत्ते मिळविली, आपणांवर मारेकरी घालणाऱ्यांचा नक्षा उतरविला, आपण मर्मभेदी भाषण करून पाठविलेला भाऊ विजयोत्सवानें येत आहे हें कानांनीं देखील जयाप्पानें ऐकिलें नाहीं ! अस्तु. ती ईशेच्छा. त्याच्यापुढें मानवी इच्छांचें काय चालणार ! बाकीची हकीकत पुढील प्रकरणीं आहेच.

**प्रकरण दुसरें समाप्त.**

४ **जवानमर्द ब्राह्मणभाई.** भाग २ रा. किं. ८≡
विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांच्या पराक्रमाचें वर्णन.

५ **जवानमर्द मराठेगडी.** भाग १ ला. किं. ८=
सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या पराक्रमाचें वर्णन.

६ **जवानमर्द मराठेगडी.** भाग २ रा. किं. ।-
वीरशिरोरत्न जनकोजी शिंदे यांच्या पराक्रमाचें वर्णन.

७ **पानपतचा मोहरा.** किं. ।-
यांत पानपतच्या भयंकर रणकंदनाचा साग्र वृत्तांत आहे.

८ **शूर अबला.** किं. ८=
झांशीकर राणी लक्ष्मीबाई, कित्तुरकर चन्नवा, ताई तेलीण, दाभाडे उमाबाई या स्त्रियांचीं चरित्रें.

९ **वीरस्नुषा राधाबाई.** बापू गोखले यांची सून. किं. ८=
एक हृदयद्रावक ऐतिहासिक गोष्ट.

१० राजकार्यधुरंधर मंडळी. भाग १ ला. किं. ।=
**फडणीस नानांच्या कारकीर्दीचें वर्णन.**

११ **मराठ्यांचा पत्रबद्ध इतिहास.** मोडींत. किं. ।≡

१२ **जवानमर्द ब्राह्मणभाई.** भाग ३ रा. किं. ८=
हरिपंत फडके यांच्या पराक्रमाचें वर्णन.

१३ **मराठे सरदार** अलिजाबहादर शिंदे. किं. ८=

१४ **मराठे सरदार** दाभाडे सेनापति. किं. ।-

१५ **देवी अहिल्याबाई होळकरीण.** किं. ८=

## २ प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रह.

१ **पैसा कसा मिळेल ?** किं. ॥॰

हें पुस्तक "आतां पुढें काय करावें" ही विवंचना पाठीस असलेल्यांच्या वाचनांत येईल तर त्यांची निम्मेहून अधिक काळजी दूर झाली असें खास समजावें.

## लहान मुलांचें चिमकुलें पुस्तकालय.

१ **नीतिधर्मपाठ पुस्तक पहिलें.** किं. ८-

२ **आपणांवरील जबाबदारी.** किं. ८-॥

३ स्वभाव. किं. ≈॥ ४ अभ्यास. किं. ≈॥
५ आजोबानें नातवास सांगितलेल्या गोष्टी. किं. ≈॥
६ धर्माची आवश्यकता आणि व्याख्या. ... किं. ≈॥

केरळकोकिळ एडिटरकृत—पुस्तकें. विक्रीस तयार.

सासरची पाठवणी. माहेरचें मूळ. दंपत्यसुखाचा ओनामा. मुलीचा समाचार. (श्लोक). सद्गुरुभक्तिशतक. (आर्या.) प्रत्येकीं. ... ... ... ... ≈
अहदरोचा फटका. ( स्वदेशी वस्तूंबद्दल ) ... ... ≈
श्रीमद्विवेकानंद स्वामींचे, मराठींत. तसविरीसह.
राजयोग. कर्मयोग. भक्तियोग. प्रत्येकीं.... ... ०॥०
सुलभवेदांत. गुरुभगवान् रामकृष्ण परमहंस. चरित्रासह. ०॥।०
श्रीरामदास स्वामींचें समग्र चरित्र. ... ... ... ०॥।०
सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी. सुधारलेली आवृत्ति २ री. ... ३।०
सार्थ व सटीप दासबोध. ग्लेझ कागद, सोनेरी बां. ... ५
सार्थ व सटीप दासबोध. साधे कागद, कापडी बां. ... ३।०
सचित्र लोकोत्तर चमत्कार २५. चित्रें १० ... ... ०॥≈
चीनचा इतिहास. ... ... ... ... ... ... ०।≈
माझें कळसूत्री घर. ( नरदेहाची सचित्र रचना. ) ... ०।≈
पंचतंत्रामृत. ( विष्णुशर्मा ) सचित्र गोष्टी. ... ... ≈
मुलींचें पहिलें पुस्तक सचित्र. ... ... ... ... ≈

त्रि. का. पित्रे, बी. ए. एल्‌ एल्‌. बी. कृत.
मुलामुलींस खाऊ. पुडा १ ला, २ रा, ३ रा, प्रत्येकीं. ≈

---

जनार्दन महादेव गुर्जर, दुकान रामवाडी, मुंबई.